




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264

RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स

आजचे सोन्याचे भाव

| | |
|---|---|
| 22 कॅरेट हॉलमार्क दागिणे | = 1, 45, 600/- |
| 20 कॅरेट मणी | = 1, 32, 370/- |
| 18 कॅरेट रोज गोल्ड | = 1, 19, 120/- |
| 16 कॅरेट मुरणी | = 1, 05, 890/- |

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ५७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । ०७/०३/२०२६ । पाने - ६



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून राजेन्द्र विश्वासाची सार्थ परंपरा...


# छ. शिवाजी महाराजांचे बसस्थानकासमोर भव्य स्मारक करणार - आ. सत्यजीत तांबे



छाया– प्रसाद सुतार, संगमनेर

## मत नोंदणीस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली बस स्थानकासमोर अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, भव्य उभे महाराजांचे स्मारक आणि सिंहासनाधीश्वर महाराजांचे पूर्णाकृती स्मारक असे तीन पर्याय देण्यात आले असून सर्व नागरिकांनी आपले मत नोंदवा. ही नोंदणी तीन दिवस सुरू राहणार असून सर्वांनी आपले मत नोंदवावे.आपल्या सगळ्यांच्या मताचा आदर करून येत्या काळात भव्य स्मारक उभारण्यात येईल असे आवाहन आमदार सत्यजित तांबे यांनी केले असून पहिल्या दिवशी ६११३ नागरिकांनी मत नोंदणी केली आहे.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर हायटेक बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक व्हावे ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांची इच्छा आहे. याकरता त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. २०१८ मध्ये नगरपालिकेने याबाबत प्रथम प्रस्ताव केला. जे आता स्मारकाची मागणी करतात ते त्यावेळी कुठेच नव्हते. या स्मारकासाठी शासनाकडे निधीची मागणी आहेच. अन्यथा शासनाच्या मदतीशिवाय लोकवर्गणी, नगरपालिका, आमदार निधी, जिल्हा विकास नियोजन या माध्यमातून संगमनेर बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी जाहीर केले आहे.

संगमनेर बसस्थानक येथे संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने कसे असावे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक याबाबत नागरिकांची मत नोंदणी शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, संदीप शेठ साळुंखे, सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा, नगरसेवक विश्वासराव मुर्तडक, सौरभ कासार, भारत बोराडे, नितीन अभंग, सीमा खटाटे, दिलीपराव पुंड, अर्चना दिघे, शोभाताई पवार, सौ.प्राची काशीद, किशोर पवार, डॉ. अनुराधा सातपुते, वनिता गाडे, गजेंद्र अभंग, दिपाली जीवन पांचारीया, गणेश गुंजाळ, अमजद पठाण, विजया गुंजाळ, अमर कतारी, सरोजना पगडाल, किशोर टोकसे, प्रियांका शहा, शैलेश कलंत्री, नंदा गरुडकर, मुजीब खान पठाण, डॉ. दानिश खान, शिवजयंती उत्सव समितीचे सतीश आहेर, संजयशेठ क्षत्रीय यांच्यासह संगमनेर मधील (पान ४ वर)

# मोदी अमेरिकेची कठपुतली - खा. राऊत



मुंबई (वृत्तसंस्था)

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या इशाऱ्यावर निर्णय घेत आहे. अमेरिकेने भारतावर अनेक निर्बंध लावले. अनेक धमक्या दिल्या. भारत-पाक युद्ध आपणच अनेकवेळा थांबल्याचा दावा केला. मात्र पंतप्रधान मोदी यांनी त्याला कधीही प्रतिकार केला नाही. त्यामुळे पंतप्रधान मोदी हे अमेरिकेचे कठपुतली बनले आहे असा गंभीर आरोप शिवसेनेचे खा. संजय राऊत यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, इराणचे नौदल आपल्या बोलवण्यावर इथे आले होते, त्यांना सुखरुप पाठवण्याची जबाबदारी आपली होती. पाहुण्याच्या सुरक्षेची काळजी घेणं ही यजमान देशाची भूमिका पाहिजे. ते इथून जात असताना अमेरिका हल्ला करते आणि इराणच्या सैनिकांना ठार केले जाते. यावर भारत काही भूमिका घ्यायला किंवा निषेध करायला तयार नाही. आपल्या देशाला परराष्ट्र धोरण राहिलेले नाही, भारत कुणाचा तरी गुलाम म्हणून काम करतोय की काय हे चिंताजनक चित्र आम्हाला पाहायला मिळत आहे. भारताने दु:ख व्यक्त करायला खूप उशिर केला आहे. भारताने रशियाकडून तेल घेण्यासाठी अमेरिकेने परवानगी दिली आहे. आम्ही ठरवत नाही, अमेरिका भारताला नाचवत आहेत, मोदी हे त्यांची कठपुतळी आहे. परवानगी ही गुलामांना दिली जाते. अमेरिकेच्या मेहरबानीवर जर आपण रशियाकडून तेल खरीदी करम असू तर काय फायदा.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदेच्या पक्षाने राज्यसभेची उमेदवारी कुणाला द्यायची हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्या हायकंमाडने जर कुणाला उमेदवारी द्यायचे हे ठरवले असेल तर त्यावर मी मत व्यक्त करणार नाही. पण दलित शोषित कुटुंबातील व्यक्तीला जर पद मिळत असेल तर त्यांचे स्वागत करण्याची भूमिका आम्ही कायम घेतलेली आहे. आमचे मतभेद असतील पण सामान्य कार्यकर्त्यांना पद मिळत असेल तर त्यांचे स्वागत आहे. ज्योती वाघमारे आमच्यावर टीका करत असतील तर ते त्यांचे संस्कार आहे.संजय राऊत म्हणाले की, एका देशाच्या राष्ट्रप्रमुखाला अशा पद्धतीने ठार करणे हे जागतिक पातळीवर निषेधार्य आहेत. त्या देशातील सत्ता उलथवण्याचे काम लोकशाहीच्या माध्यमातून जनतेनेच केले पाहिजे. उद्या नरेंद्र मोदी यांच्या विषयी ट्रम्प यांना वाटले मी इथे सैन्य घुसवेल आणि मोदींना उलथवून टाकेल हे आम्ही होऊ देणार नाही. आम्ही त्यांच्या सत्तेचा पराभव लोकशाही मार्गाने करू. उद्या इस्त्रायलला वाटले मोदी आपले ऐकत नाही ते राष्ट्रहिताचे निर्णय घेऊ लागले आहेत, आम्ही त्यांच्यावर हल्ला करू तर एक देश म्हणून आम्ही हे कदापी होऊ देणार नाही.

# धरण उशाला, कोरड घशाला

## राजूर बंद ठेवत रास्ता रोको आंदोलन; ग्रामस्थांचा उस्फूर्त प्रतिसाद



छाया– बिलास तुरे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - भंडारदरा धरणातून राजूर शहराला पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करावा या प्रमुख मागणीसाठी राजूर शहर बंद ठेवत ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. वाढती लोकसंख्या आणि पिण्याच्या पाण्याचा तीव्र प्रश्न लक्षात घेता राजूरकरांनी भर उन्हात कोल्हार-घोटी रस्त्यावर बसून शासनाचे लक्ष वेधले.

आदिवासी भागातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या राजूर शहरात मागील दहा महिन्यांपासून पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सध्या सहा ते आठ दिवसांनी एकदाच पाणी मिळत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी राजूर बंद ठेवत आंदोलन छेडले.

राजूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा आणि कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी भंडारदरा धरणातून स्वतंत्र पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा योजना राबवावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच राजूर ग्रामपंचायतीतील पाणीपुरवठा व्यवस्थेत झालेल्या कथित भ्रष्टाचारावरही ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

राजूर हे परिसरातील मध्यवर्ती गाव असल्याने इतर शहरांप्रमाणेच येथेही धरणातून थेट पिण्याच्या पाण्याची योजना राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. गावाला सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या आंदोलनात अविनाश बनसोडे, सौ. रजनी टीभे, नंदकिशोर चोथवे, राम पन्हाळे, राजेंद्र वाघ, काशिनाथ भडांगे तसेच सामाजिक कार्यकर्ते संतोष मुर्तडक यांनी आपली मनोगते व्यक्त केली. दरम्यान, आंदोलनकर्त्यांचे निवेदन मंडल अधिकारी कल्पना भोजने यांनी स्वीकारले. यावेळी जीवन प्राधिकरण अधिकारी मधुकर बिन्नर, ग्रामविकास अधिकारी राकेश पाटील, तलाठी राकेश साबळे आदी उपस्थित होते.

या आंदोलनादरम्यान राजूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## नाटाळाच्या माथी काठी

# घारगाव बलात्कार प्रकरणातील आरोपी सैफुल्ला शेख चा जामीन अर्ज फेटाळला

युवावार्ता (प्रतिनिधी)

तालुक्यातील घारगाव येथील बहुचर्चित बलात्कार प्रकरणात आरोपी सैफुल्ला शेख याचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळल्याने पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी झटणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाच्यावतीने संगमनेर शहरात १३ ऑक्टोबर रोजी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

या मोर्च्यात हिंदुत्ववादी संघटना, महिला संघटना आणि स्थानिक नागरिकांचा प्रचंड सहभाग होता. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, तसेच पीडितेला न्याय मिळावा, या मागण्यांसाठी घोषणाबाजी करत नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. या मोर्च्यात आमदार संग्रामभय्या जगताप, आमदार अमोल खताळ पाटील तसेच हिंदुत्ववादी आदिवासी नेते मारुती मेंगाळ आणि योगेश सूर्यवंशी यांनी सहभाग घेतला.

आरोपी सैफुल्ला शेख याने यापूर्वीही जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडे केलेला अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर सैफुल्ला शेख याने मुंबई खंडपीठ उच्च न्यायालयात मधील छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी दाखल केलेला जामीन अर्ज काढून घेवुन परत संगमनेर जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. नेर्लेकर यांचे कडे दाखल केलेल्या न्यायालयीन निकालात ड. सोनाली बोटवे यांचा युक्तिवाद निर्णायक ठरला आहे पीडितेच्या वतीने ड.सोनाली बोटवे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना ड. विशाल जाधव यांनी सहकार्य केले. सरकारपक्षातर्फे वकील बी. जी. कोल्हे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. न्यायालयाने सर्व युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आरोपी सैफुल्ला शेख याचा जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश मा. जिल्हा न्यायाधीश नेरलेकर साहेब यांनी दिला. या प्रकरणाचा तपास डी. वाय. एस. पी. कुणाल सोनवणे यांनी केला असून, तपासात त्यांना कोर्ट ऑर्डरली डावरे यांनी सहकार्य केले.

### हिंदुत्ववादी संघटनांकडून समाधान

या प्रकरणात आदीवाशी समाजातील संताप लक्षात घेऊन हिंदुत्ववादी संघटनांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. न्यायालयाच्या आजच्या निर्णयामुळे या संघटनांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. या घटनेमुळे परिसरातील सामाजिक वातावरणात तणाव आणि अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र, न्यायालयाच्या आजच्या निर्णयामुळे नागरिकांमध्ये न्यायाविषयी विश्वास पुन्हा दृढ झाल्याची प्रतिक्रिया सर्वत्र उमटली आहे.

स्थानिक हिंदू समाज, व विश्व हिंदू परिषद बजरंग दल दुर्गावहिनी संगमनेर शहर संयोजिका ड सोनाली बोटवे आणि कार्यकर्त्यांनी प्रशासनाला पुढेही सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, अशा घटना पुन्हा घडू नयेत, हेच खरे न्यायाचे स्वरूप आहे अशी भावना समाजातून व्यक्त होत आहे.









# डीजे वाजवल्यास कारवाईचा इशारा




एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - लग्नाची वरात, हळदीच्या कार्यक्रमासाठी कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविल्यास मंगल कार्यालय मालक, डीजे चालकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. डीजेला आता मंगल कार्यालय चालकांनाही जबाबदार धरले जाणार आहे. शहरासह उपनगरांतील ३६ मंगल कार्यालयांना पोलिसांकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. मुलांच्या परीक्षा सुरु असल्याने अनेकजण घरातील टीव्ही बंद ठेवतात. मात्र रस्त्यावर बिनधास्तपणे गर्दीत वरात काढून कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविले जातात. रस्त्याने जाणाऱ्या लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिलांना आवाजाचा त्रास होतो. रस्त्याची एक बाजू यामुळे अडविली जाते. प्ररिणामी वाहतुकीची कोंडी होते. वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना नागरिकाना मनस्ताप सहन करावा लागतो. (पान ६ वर)

# जिष्णू वर्मा महाराष्ट्राचे नवे राज्यपाल



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर तेलंगणाच्या राज्यपालपदी हिमाचल प्रदेशची जबाबदारी असलेल्या शिव प्रताप शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिष्णू देव वर्मा हे ईशान्य भारतातील अनुभवी राजकारणी म्हणून ओळखले जातात. त्यांनी त्रिपुरा राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्रासह एकूण ९ राज्यांच्या राज्यपालांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्राच्या राज्यपालपदी जिष्णू देव वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी ते तेलंगणाचे राज्यपाल म्हणून कार्यरत होते. प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या वर्मा यांच्या खांद्यावर आता महाराष्ट्राची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

राष्ट्रपती भवनाकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी.व्ही. आनंद बोस यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला असून, त्यांच्या जागी तामिळनाडूचे राज्यपाल आर.एन. रवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या मोठ्या फेरबदलात हिमाचल प्रदेशचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांना तेलंगणाची जबाबदारी देण्यात आली आहे, तर बिहारच्या राज्यपालपदी निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्त्यांमध्ये लडाख आणि दिल्लीच्या उपराज्यपालांच्या पदांमध्येही मोठे बदल करण्यात आले आहेत. विनय कुमार सक्सेना यांची लडाखच्या लेफ्टनंट गव्हर्नरपदी नियुक्ती झाली असून, दिल्लीच्या रिक्त जागी तरनजित सिंग संधू यांची वर्णी लागली आहे. हे सर्व बदल संबंधित व्यक्तींनी पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून लागू होतील. महाराष्ट्रात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवीन राज्यपालांची नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

जिष्णु देव वर्मा हे भारतीय जनता पक्षाचे नेते आहेत. ते ३१ जुलै २०२४ पासून तेलंगणाचे ३ रे राज्यपाल म्हणून कार्यरत होते. देव वर्मा यांनी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला रामजन्मभूमी आंदोलनादरम्यान भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. १९९३ मध्ये त्यांना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बनवण्यात आले. त्यांनी यापूर्वी २०१८-२३ पर्यंत त्रिपुराचे दुसरे उपमुख्यमंत्री म्हणून काम केले.

# बसस्थानक प्रशासनावर राजकीय दबावाचा आरोप

## सकल मराठा समाज आक्रमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्य परिवहन महामंडळाच्या संगमनेर बसस्थानकाजवळील येवले चहा समोरील जागेत शिवजन्मोत्सव सोहळा (शिवजयंती) साजरा करण्यासाठी सकल मराठा समाजाने रितसर परवानगी मागूनही ती नाकारण्यात आली होती. मात्र आज त्याच ठिकाणी तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती कार्यक्रमासाठी स्थानिक दोन्ही आमदारांना परवानगी देण्यात आल्याने बसस्थानक प्रशासनावर राजकीय दबावाखाली काम करत असल्याचा आणि भेदभाव केल्याचा आरोप सकल मराठा समाजाने केला आहे.

सकल मराठा समाजाने दि. १ जानेवारी २०२६ रोजी संगमनेर बसस्थानकाजवळील येवले चहा समोरील जागेत गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवजन्मोत्सव सोहळा (शिवजयंती) साजरा करण्यासाठी परवानगी मिळावी, असा अर्ज सादर केला होता. मात्र आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ संगमनेर यांच्या माध्यमातून विभाग नियंत्रक, रा.प. अहिल्यानगर यांनी दिलेल्या पत्राद्वारे सदर परवानगी नाकारण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक, संगमनेर शहर पोलीस ठाणे यांनी दिलेल्या अहवालानुसार बसस्थानकाचा मुख्य प्रवेशद्वार आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० जवळ असल्यामुळे त्या ठिकाणी कार्यक्रमास परवानगी दिल्यास वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे कारण नमूद करण्यात आले होते. तसेच बसस्थानकावरील व्यापारी संकुल सहकारी संस्थेनेही वाहनतळावरील रिकाम्या जागेत कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी भूमिका घेतल्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते.

मात्र, आता त्याच ठिकाणी तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती कार्यक्रमासाठी दोन्ही आमदारांना परवानगी देण्यात आल्याने सकल मराठा समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शासकीय नियमानुसार तारखेची शिवजयंती साजरी करण्यासाठी आम्ही रितसर परवानगी मागितली असताना कायदा व सुव्यवस्थेचे कारण देत परवानगी नाकारण्यात आली. मग आता त्याच ठिकाणी कार्यक्रमासाठी परवानगी देताना कायदा व सुव्यवस्थेचा किंवा वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत नाही का? असा सवाल सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

बसस्थानक प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत असून सामान्य नागरिक आणि संघटनांबाबत भेदभाव केला जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच यापुढे अशा प्रकारचा भेदभाव सुरू राहिल्यास सकल मराठा समाज आक्रमक भूमिका घेईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# युद्धाच्या झळा महाराष्ट्राला

## व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आखाती युद्धामुळे व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून, पुण्यात व्यावसायिक सिलेंडरचे वाटप थांबवण्यात आले आहे. घरगुती गॅस सिलेंडरच्या वाटपाला सध्या प्राधान्य दिले जाणार आहे. वितरकांना शुक्रवारी सकाळपासून व्यावसायिक सिलेंडरच्या नवीन ऑर्डर न घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

एचपीसीएल आणि बीपीसीएल या प्रमुख गॅस वितरण कंपन्यांनी त्यांच्या वितरकांना चाकण आणि शिरूर येथील प्लांटमधून या सूचना दिल्या आहेत. ५, १९, ३५, ४७ आणि ४२७ किलो वजनाच्या व्यावसायिक सिलेंडरच्या ऑर्डर सध्या थांबवण्यात आल्या आहेत. पुढील सूचना मिळेपर्यंत वितरकांनी व्यावसायिक गॅससाठी वाहने पाठवू नयेत, असेही सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे हॉटेल आणि उद्योग क्षेत्रावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. आखाती युद्धामुळे गॅस वितरणावर परिणाम झाला असून, गॅसचा पुरवठा मर्यादित झाला आहे. घरगुती गॅस सिलेंडरच्या वाटपात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी व्यावसायिक सिलेंडरचे वाटप काही दिवसांसाठी थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत गॅस वितरण वितरक जीवन अल्हाट यांनी माहिती दिली की, औद्योगिक वापराचे व्यावसायिक सिलेंडर कंपनी भरणार नाही, केवळ घरगुती सिलेंडर भरले जातील असे त्यांना सांगण्यात आले आहे. सिलेंडर भरण्यासाठी चाकण येथील गॅस कंपनीत गेलेले ट्रक गॅस न भरताच परत पाठवण्यात आले आहेत.

# भारतीय वायूदलाचे लढाऊ विमान कोसळले

## स्क्वॉड्रन लेफ्टनंटसह फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर शहीद



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आसाममधील कार्बी आंगलोंग भागात प्रशिक्षणादरम्यान रडारवरून गायब झालेले भारतीय हवाई दलाचे सुखोई एसयू-३० एमकेआय लढाऊ विमान कोसळले. या अपघातात दोन्ही वैमानिक, स्कॉड्रन लीडर अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर शहीद झाले. पूर्वेश दुरगकर भंडारा जिल्ह्याचे सुपूत्र आहेत. आज (६ मार्च) पहाटे एकच्या सुमारास हवाई दलाने या अपघाताची पुष्टी केली. सकाळी सव्वा नऊ वाजता दुसऱ्या एक्स-पोस्टने दोन्ही वैमानिकांच्या मृत्यूची माहिती दिली. लष्कराच्या म्हणण्यानुसार, शोध मोहीम सुरू आहे. लढाऊ विमान नियमित उड्डाण किंवा मोहिमेवर असताना त्याचा जमिनीवरील नियंत्रणाशी संपर्क तुटला. हवाई दलाच्या म्हणण्यानुसार, रडारशी संपर्क तुटल्यानंतर, हवाई दलाने ताबडतोब अलर्ट जारी केला आणि घटनेची चौकशी करण्यासाठी आयएएफ टीम आसामला पाठवली. विमानाचे नेमके स्थान आणि संपर्क तुटण्याचे कारण सध्या निश्चित केले जात आहे.

सुखोई एसयू-३०एमकेआय हे भारतीय हवाई दलाच्या सर्वात प्रगत आणि शक्तिशाली लढाऊ विमानांपैकी एक मानले जाते. हे एक दोन इंजिन असलेले बहुउद्देशीय लढाऊ विमान आहे जे हवाई संरक्षण, लांब पल्ल्याच्या हल्ल्यासाठी आणि देखरेखीसाठी वापरण्यात येते. गेल्या १२ वर्षात आठव्यांदा सुखोई फायटर जेट कोसळलं आहे.

# राशियाकडून तेल घेण्यास भारताला तीस दिवसांची परवानगी - अमेरिका




नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने भारतीय रिफायनरीजना रशियन तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची परवानगी दिली आहे. ही मुदत ४ एप्रिल २०२६ रोजी संपणार आहे. इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक तेल पुरवठा विस्कळीत होण्याची भीती निर्माण झाली आहे. 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' हा महत्त्वाचा मार्ग धोक्यात आल्यामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा प्रवाह सुरळीत राहावा, यासाठी अमेरिकेने हे पाऊल उचलले आहे. ही सवलत सरसकट सर्व रशियन तेलासाठी नाही. जी जहाजे ५ मार्च २०२६ पूर्वी रशियातून निघाली होती आणि सध्या समुद्रात अडकली आहेत , फक्त त्याच मालाची खरेदी भारताला करता येणार आहे.अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेन्ट यांनी स्पष्ट केले की, हा एक 'शॉर्ट टर्म' मार्ग आहे. यामुळे रशियाला मोठा आर्थिक फायदा होणार नाही, कारण हे तेल आधीच जहाजांवर चढवण्यात आलेले आहे. स्कॉट बेसेन्ट यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या ऊर्जा धोरणामुळे अमेरिका आता इतिहासातील सर्वाधिक तेल आणि वायू उत्पादन करणारा देश बनला आहे. जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांना रशियन तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची तात्पुरती सवलत दिली आहे. हा निर्णय जाणीवपूर्वक कमी कालावधीसाठी घेण्यात आला. जेणेकरून रशियाला याचा मोठा आर्थिक फायदा होणार नाही. ही सवलत केवळ अशाच रशियन तेलासाठी आहे, जे सध्या समुद्रात जहाजांवर अडकून पडले.




**संगमनेर - शहरातील मेनरोड शिवसेना शाखा क्र. ११ च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आ. सत्यजीत तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी भेट देऊन कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी. माजी नगरसेवक कैलास वाकचौरे, जावेदभाई जाहागीरदार, बाळासाहेब डावखरे, भैय्या तांबोळी, दत्ता भांदुर्गे, समीर ओझा, अमित पवार, गोटूशेठ अट्टल, नितिन अभंग, गजेंद्र अभंग, शंकर माताडे, संजय वलवाणी, विजय बाप्ते, शिसोदे सर, लाला दायमा, राम कर्पे, शाम कर्पे, दिलीप पवार उपस्थित होते.**

# राज्यात ४८ लाख कुणबी नोंदी

## 12 लाखांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रे वितरित




मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा समाजाशी संबंधित विविध मुद्द्यांवर आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक विधानभवनात पार पडली. या बैठकीत मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात आला. तसेच मराठा आरक्षण आणि त्यासंदर्भातील शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी पुढील दिशा काय असावी यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या कामकाजाचा आढावा सादर करण्यात आला.

शिंदे समितीने काम सुरू केल्यापासून राज्यभरात मोठ्या प्रमाणावर कुणबी नोंदी शोधण्यात आल्या आहेत. समितीच्या अहवालानुसार आतापर्यंत राज्यात ४८ लाख कुणबी नोंदी आढळल्या आहेत. या नोंदींच्या आधारे मराठा समाजातील अनेकांना कुणबी प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यभरात एकूण १२ लाख ११ हजार ३०३ जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या प्रक्रियेमुळे मराठा समाजातील अनेकांना आरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा दिलासा मिळत असल्याचेही सांगण्यात आले.

प्रदेशानुसार पाहता छत्रपती संभाजीनगर विभागात मोठ्या प्रमाणावर प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या विभागात आतापर्यंत २ लाख ५७ हजार ८४ कुणबी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. सप्टेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीतच या विभागात ४९ हजार ९५८ प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातच ३४ हजार ६९२ कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली असल्याची माहितीही बैठकीत समोर आली.

दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण देणाऱ्या कायद्याविरोधात तसेच हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीसंदर्भात न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांचाही आढावा या बैठकीत घेण्यात आला. या प्रकरणात सरकारची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी विशेष समुपदेशक (स्पेशल कौन्सेल) नियुक्त करण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्याचबरोबर सातारा गॅझेटियर लागू करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त, पुणे यांनी सविस्तर अहवाल सादर करावा, असेही मंत्रिमंडळ उपसमितीने सांगितले.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या काळात दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबतही या बैठकीत चर्चा झाली. आंदोलनादरम्यान एकूण १६१ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी ७१ गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्याची माहिती देण्यात आली. मुंबईतील आंदोलनाच्या वेळी दाखल झालेल्या ८ गुन्ह्यांपैकी ७ गुन्हे मागे घेण्यात आले असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तसेच आंदोलनादरम्यान मृत्युमुखी पडलेल्या ३०६ जणांपैकी २७५ जणांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. उर्वरित ३१ प्रकरणांमध्ये लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

# एसटी चालकांची अल्कोटेस्ट तपासणी अनिवार्य



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांनी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली. यावेळी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अनेक मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. या धक्कादायक प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते.

त्या अनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत. सदर चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निर्देशानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. तसेच वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. चालक व वाहकांची मद्यपान तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आगार व्यवस्थापकांनीही नियमित नियंत्रण ठेवून या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बस मार्गावर असताना चालकाने नियंत्रण कक्षात लॉगबुकची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. चालकाने नोंद केल्यानंतर त्याची पुन्हा एकदा अल्कोटेस्ट तपासणी करून योग्य नोंद घेतल्यानंतरच पुढील मार्गावर पाठविण्याची सक्ती करण्यात आली आहे. ही तपासणी नियमितपणे होत आहे की नाही, याची खात्री स्थानक प्रमुखांनी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय बसस्थानक व आगार परिसरातील चालक, वाहक आणि विश्रांतीगृहांमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांचीही वेळोवेळी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित विभागातील पालक अधिकाऱ्यांनी आगार व बसस्थानक भेटीदरम्यान या उपाययोजनांची अंमलबजावणी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, या बाबतीत दक्षता विभागाकडून वेळोवेळी गोपनीय तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.












# वीरभद्र पतसंस्था निमज कडून भारतरत्न राजीव गांधी विद्यालयाला ५१ हजार रुपयांची मदत



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

वीरभद्र बिगर शेती सहकारी पतसंस्था, निमज यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत 'भारतरत्न राजीव गांधी विद्यालय, निमज' या शाळेला संगणक लॅब उभारण्यासाठी ५१,००० रुपयांचा निधी सुपूर्द करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या युगात मागे राहू नये, या उदात्त हेतूने पतसंस्थेच्या संचालक मंडळाने हा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

'वीरभद्र बिगर शेती सहकारी पतसंस्थेने' सहकार क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. केवळ आर्थिक व्यवहार न करता, समाजातील शैक्षणिक आणि सामाजिक गरजांकडे माणुसकीच्या दृष्टिकोनातून पाहण्याचे त्यांचे धोरण अत्यंत कौतुकास्पद आहे.

विद्यालयाच्या प्रत्येक टप्प्यावर पतसंस्थेचे नेहमीच सहकार्य लाभले असून, या पाठबळामुळेच विद्यालय आज प्रगतीपथावर आहे. सहकार आणि शिक्षण यांचा हा समन्वय ग्रामीण भागाच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल. याप्रसंगी बोलताना पतसंस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन व संचालक मंडळाने सांगितले की, शाळेत जर आधुनिक भौतिक सुविधा उपलब्ध झाल्या, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता निश्चितपणे वाढेल.

पतसंस्थेने केलेल्या या मदतीबद्दल 'वीरभद्र शिक्षण प्रसारक संस्था' आणि विद्यालयाच्या वतीने पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले. पतसंस्थेच्या या सहकार्यामुळे विद्यालय प्रगतीपथावर असून, यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची दारे खुली होणार आहेत, अशी भावना मुख्याध्यापकांनी व्यक्त केले. पतसंस्थेच्या या कार्याचे संपूर्ण परिसरात कौतुक होत आहे.

# संगमनेरमध्ये सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्टचा बिझनेस प्रेझेंटेशन कॉन्क्लेव

## ५०० पेक्षा अधिक बिझनेस रेफरन्सची देवाणघेवाण



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्ट च्या संगमनेर चॅप्टरतर्फे आयोजित करण्यात आलेला मेगा बिझनेस प्रेझेंटेशन कॉन्क्लेव उत्साहात आणि प्रभावी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्ट चे सेक्रेटरी जनरल सुहास फडणीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच नगर रिजनचे रिजन हेड सागर हासे आणि डेप्युटी रिजन हेड डॉ. सागर गोपाळे यांची विशेष उपस्थिती होती.

या कॉन्क्लेवमध्ये विविध क्षेत्रातील उद्योजक सदस्यांनी आपापले बिझनेस प्रेझेंटेशन सादर केले. एकाच दिवशी आठ बिझनेस प्रेझेंटेशन सादर होत असताना सदस्यांना नेटवर्किंग आणि व्यवसाय वाढीच्या संधी उपलब्ध झाल्या. सेक्रेटरी जनरल सुहास फडणीस यांनी आपल्या खास शैलीत उपस्थित सदस्यांशी संवाद साधत बिझनेस ग्रोथसाठी आवश्यक असलेल्या विविध ट्रिक्स, अनुभव आणि मार्गदर्शन दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित सदस्यांना व्यवसायातील संधी, नेटवर्किंगचे महत्त्व आणि योग्य बिझनेस स्ट्रॅटेजी याबाबत उपयुक्त माहिती मिळाली.

कार्यक्रमामध्ये वन मिनिट प्रेझेंटेशन, दहा मिनिटांचे बिझनेस सादरीकरण तसेच मिक्सर नेटवर्किंगच्या माध्यमातून सदस्यांनी एकमेकांशी व्यावसायिक संवाद साधला. या कार्यक्रमातून ५०० पेक्षा अधिक बिझनेस रेफरन्सेसची देवाणघेवाण झाली असून भविष्यात दोन ते तीन जॉइंट व्हेंचर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. नगर रिजनचे रिजन हेड सागर हासे आणि डेप्युटी रिजन हेड डॉ. सागर गोपाळे यांनी संपूर्ण कार्यक्रमात उपस्थित राहून सदस्यांशी संवाद साधला व मीटिंग यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगमनेर चॅप्टरचे चेअरमन अण्णासाहेब थोरात, सेक्रेटरी प्रसाद गोडगे, ट्रेझरर सुदाम एरंडे तसेच कोअर टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी मंदार गुंजाळ यांनी मेनू व इतर व्यवस्था उत्कृष्ट रीतीने पार पाडली. एलईडी स्क्रीनवरील जाहिरातींचे संकलन व त्याचे सादरीकरणासाठी पीपीटी तयार करण्यात रोहित नागरे यांनी विशेष भूमिका बजावली. कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांचे तसेच क्रॉस चॅप्टर सदस्यांचे स्वागत नारायण कोल्हे, धनंजय देशमुख, अनिकेत वाकचौरे आणि युवराज देशमुख यांनी केले. हा कार्यक्रम निसर्गरम्य वातावरणातील नेचर हॉटेल, संगमनेर येथे पार पडला. या कॉन्क्लेवला नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, वाशी तसेच हिरकणी येथील सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# संगमनेर विभागात राष्ट्रीय विद्युत जनमित्र दिन साजरा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

महावितरणच्या संगमनेर विभागात लाइनमन डे अर्थात राष्ट्रीय विद्युत जनमित्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वीज ग्राहकांना अविरत सेवा देणाऱ्या जनमित्रांच्या कार्याचा गौरव आणि सुरक्षेचा जागर करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार होते. सूत्रसंचालन सहाय्यक अभियंता दुर्गेश जगताप होते. तर उपकार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, धनंजय खैरनार, प्रेमकुमार पाटील व सर्व शाखा अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात संदीप पाचंगे यांनी चुकीला माफी नाही हे सुरक्षा प्रबोधनपर नाट्य सादर केले. वीज क्षेत्रात काम करताना सुरक्षिततेचे नियम पाळणे किती अनिवार्य

आहे, याचे प्रभावी दर्शनको नाट्यातून घडले. या कार्यक्रम वैशिष्ट्य म्हणजे उपस्थित महिला जनमित्रांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. क्षेत्रिय स्तरावर काम करताना येणारे अनुभव त्यांनी मांडले आणि जनमित्रांच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानले. 'सुरक्षा प्रथम' हे ब्रीद जपत, उपस्थित जनमित्रांना सेफ्टी टूल किट प्रदान करण्यात आली. तसेच कामाच्या ठिकाणी अपघात विरहित कार्य करण्याची सुरक्षा शपथ सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिकरीत्या घेतली.

सदर कार्यक्रम संगमनेर शहरासह राहाता, शिर्डी, कोपरगाव (शहर व ग्रामीण), अकोले आणि राजूर अशा सर्व उपविभागांमध्ये साजरा करण्यात आला. सपूर्ण विभागातून एकूण . ६०० कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

# घुलेवाडी विद्यालयात पर्यावरणपूरक नैसर्गिक रंग वापरण्याचे आवाहन

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घुलेवाडी येथे धुलीवंदन व रंगपंचमी सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी रासायनिक रंगांचा वापर टाळून निसर्गातील झाडे, पाने व फुलांपासून तयार होणाऱ्या नैसर्गिक रंगांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.हा उपक्रम वन विभागाच्या भरीतकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षण प्रसारक संस्थेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राध्यापिका कविता काटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना नैसर्गिक रंग तयार करण्याच्या विविध पद्धतींबाबत माहिती देण्यात आली तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे त्यांचे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पालक व गुलमोहराच्या पानांपासून हिरवा रंग तयार करण्याची पद्धत समजावून सांगण्यात आली. या पानांची बारीक पेस्ट करून त्यात पाणी मिसळून रात्रभर ठेवले असता दुसऱ्या दिवशी ते मिश्रण गाळून उकळविल्यास सुंदर हिरवा रंग तयार होतो. तसेच हळकुंड भिजवून त्याची पेस्ट तयार करून त्यात पाणी मिसळून उकळविल्यास पिवळा रंग तयार होतो. झेंडूच्या फुलांच्या पाकळ्या सावलीत वाळवून त्याची पूड केल्यास कोरडा पिवळा रंग तयार होतो, अशी माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

याशिवाय गुलाब व जास्वंदाच्या फुलांच्या पाकळ्या सावलीत वाळवून त्याची पूड केल्यास कोरडा लाल रंग तयार करता येतो. बीट किसून ते पाण्यात भिजवून त्याची पेस्ट तयार करून उकळविल्यानंतर त्यापासून आकर्षक मॅजेंटा रंग तयार करता येतो. तसेच पळसाची फुले रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी उकळविल्यास केशरी रंग तयार होतो, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी रासायनिक रंगांमुळे त्वचेवर होणारे दुष्परिणाम तसेच पर्यावरणाला होणारी हानी याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. नैसर्गिक रंगांचा वापर केल्यास पर्यावरणाचे संरक्षण होते आणि आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक घोडे सर उपस्थित होते. तसेच राऊत सर, निर्हाळी सर, बड सर, गायकवाड सर, लावरे मॅडम यांची उपस्थिती होती. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड. प्रथम वर्षाचे छात्र-शिक्षक अनुजा सराफ, मयुरी मेंगाळ, पायल बांबेरे, मयुरी गांजवे, प्रांजली लोखंडे, शुभम गायकवाड व सुप्रभा अंभोरे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सण साजरा करण्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून नैसर्गिक रंगांचा वापर करण्याची प्रेरणा मिळाली.

# मालपाणी विद्यालयात शिवजयंती उत्साहात




संगमनेर

()-

संगमनेर येथील मालपाणी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. विविध भाषणे, शिवरायांवरील गीते आणि जयघोषांनी संपूर्ण विद्यालय परिसर शिवमय झाला. कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार तसेच पालक प्रतिनिधी स्वाती भारत फटांगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर विद्यालयाच्या गीतमंचाने शिवरायांच्या पराक्रमाचे माझ्या राजाचं नाव गाजतंय आणि दोनच राजे इथे जन्मले ही दोन प्रेरणादायी गीते सादर केली. ही गीते संगीत शिक्षक मंगेश बिडवे व दर्शन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे सादर केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षरा सचिन भालेराव हिने केले. उपस्थित मान्यवरांचा परिचय व सत्काराचे निवेदन सुदर्शन प्रमोद मुर्तडक याने केले. यावेळी आदित्य उमेश शिंदे, श्रेया बाबाजी फटांगरे, शर्वरी सुधीर हासे, स्वराज संतोष हासे, वेदा भागवत पोखरकर व ओंकार जगदीश सहाणे या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनचरित्रावर प्रभावी भाषणे केली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या जय भवानी, जय शिवाजी या घोषणांनी संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते त्यांच्या महान कार्यापर्यंतचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. आई-वडिलांचे संस्कार, गुरू दादोजी कोंडदेव यांचे मार्गदर्शन आणि अथक परिश्रम यांच्या बळावर शिवरायांनी अनेक गड-किल्ले जिंकत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, असे त्यांनी सांगितले. शिवरायांचे धैर्य, दूरदृष्टी आणि प्रजाप्रेम यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकारावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी भारत फटांगरे व रुचिका राजेंद्र गवळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर्या जयराम थिटमे हिने मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षिका गीतांजली गवंडी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिवजयंतीच्या या उत्साहपूर्ण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमान आणि प्रेरणा निर्माण झाली.

# संगमनेरात उभारणार शिवरायांचे स्मारक

## छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ स्मारक होणारच !

संगमनेर तालुक्याला इतिहासाचा समृद्ध आणि अभिमानास्पद वारसा लाभलेला आहे. मात्र हा इतिहास जनतेपर्यंत पोहोचावा, पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळावी आणि ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व्हावे, यासाठी गेल्या अनेक दशकांत विशेष प्रयत्न झाले नाहीत, अशी खंत अनेकदा व्यक्त होत आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हा विषय राजकारणाचा नसून तो प्रेरणा, शौर्य आणि स्वराज्याच्या इतिहासाचा आहे. तरीही विधानसभा निवडणुकीनंतर काही राजकीय वाद निर्माण झाल्याने या विषयावर श्रेयवाद सुरू झाला. त्यामुळे काही बाबी स्पष्ट होणे आवश्यक आहे.




हिंदुत्ववादी आमदार अमोल खताळ पाटील यांनी आमदार झाल्यानंतर पहिल्याच अधिवेशनात पेमगिरी येथील शहागड (भीमगड) या ऐतिहासिक किल्ल्याचा विषय मांडत किल्ला संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी शासनाचे लक्ष वेधले.

**अश्वारूढ स्मारकाची वैशिष्ट्ये**

**शौर्याचे प्रतीक :** छत्रपती शिवाजी महाराज पराक्रमी योद्धे व स्वराज्य संस्थापक होते, याचे दर्शन अश्वारूढ प्रतिमेतून होते.

**विजयाचे प्रतीक :** प्रतापगड, उंबरखिंड यांसारख्या ऐतिहासिक स्थळांवरील स्मारकांप्रमाणे विजयाची आठवण जपणारे स्वरूप.

**गनिमी काव्याची आठवण :** घोडदळाच्या वेगवान हालचालींमुळे गनिमी कावा तंत्र प्रभावी ठरले.

**प्रेरणादायी संदेश :** अशा स्मारकांमुळे युवकांमध्ये शौर्य, राष्ट्रप्रेम आणि इतिहासाविषयी अभिमान निर्माण होतो.

यापूर्वीच्या लोकप्रतिनिधींनी या किल्ल्याच्या ऐतिहासिक जतनाकडे अपेक्षित लक्ष दिले नसल्याची टीका स्थानिक पातळीवर होत आली आहे. पेमगिरीच्या डोंगररांगेतील शहागड हा शिवकालीन इतिहासाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा किल्ला मानला जातो. येथे शहाजी राजांनी स्वराज्य निर्मितीचा प्रयत्न केला होता, असा इतिहास सांगितला जातो. त्यामुळे या ठिकाणी स्वराज्य संकल्पक शहाजी महाराजांचे स्मारक व्हावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून अनेक वर्षांपासून होत आहे. या परिसरात पेमादेवीचे ऐतिहासिक मंदिर असून येथे मोठ्या प्रमाणावर भाविक येत असतात. गडावर जाणाऱ्या रस्त्यालगत दाट झाडी असल्याने रात्रीच्या वेळी भीतीचे वातावरण निर्माण होत होते. ही बाब लक्षात घेऊन आमदार अमोल खताळ पाटील यांनी निधी उपलब्ध करून देत गडावर जाणारा रस्ता प्रकाशमय करण्याचा उपक्रम राबवला.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात पेमगिरी येथे पर्यटन विकासासाठी योजना जाहीर झाल्या. पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या संभाव्य भेटीच्या बातम्याही प्रसारमाध्यमांत आल्या. मात्र प्रत्यक्षात त्याचा ठोस परिणाम दिसून आला नाही, अशी टीका स्थानिकांकडून केली जाते.

दरम्यान, संगमनेर शहरात बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात येत आहे. अश्वारूढ स्मारकाचा विचार हा केवळ प्रतीकात्मक नसून त्यामागे ऐतिहासिक संदर्भही आहेत. निजामशाहीविरोधात मराठ्यांनी उभारलेल्या घोडदळाने मोठी भूमिका बजावली होती. त्यामुळे अश्वारूढ प्रतिमा ही शौर्य, गतिमानता आणि युद्धनीतीचे प्रतीक मानली जाते.

आमदार अमोल खताळ पाटील हे आमदार होण्यापूर्वीपासूनच या अश्वारूढ स्मारकासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले जाते. संगमनेर शिवस्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर केला होता. तसेच जागेच्या प्रश्नासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचीही भेट घेण्यात आली असून हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तालुक्यात शिवजयंती उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याची परंपरा कायम राखत शिवप्रेमींसाठी आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला आहे. आगामी काळात छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ स्मारक उभारण्यासाठी संगमनेर तालुक्यातील शिवप्रेमी भक्कमपणे उभे राहतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सर्वांना शिवजयंतीनिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा.

# संपादकीय...

## विश्वविजयासाठी फक्त एक पावलाचे अंतर

क्रिकेटप्रेमींसाठी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी सायंकाळी रंगलेला सामना हा खऱ्या अर्थाने थराराचा शिखरबिंदू ठरला. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपान्त्य फेरीत भारताने इंग्लंडवर अवघ्या सात धावांनी मात करत अंतिम फेरीत धडक मारली आणि सलग दुसऱ्यांदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची कामगिरी केली. हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला आणि दोन्ही संघांनी प्रेक्षकांना अक्षरशः खुर्चीच्या टोकावर बसवून ठेवले. अखेरच्या क्षणापर्यंत अनिश्चितता कायम राहिल्याने हा सामना या स्पर्धेतील सर्वात रोमहर्षक लढतींपैकी एक ठरला. उपान्त्य फेरीतील या सामन्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. कारण बुधवारी न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून आधीच अंतिम फेरी गाठली होती. त्यामुळे न्यूझीलंडसमोर अंतिम लढतीत कोण उभे राहणार, याचा निर्णय या सामन्यातून होणार होता. क्रिकेटप्रेमींची नजर दूरचित्रवाणी संचांकडे खिळली होती. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुक्स याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारताच्या फलंदाजीची ताकद लक्षात घेता सुरुवातीलाच भारतीय फलंदाजांना दबावाखाली आणण्याचा त्याचा प्रयत्न होता. इंग्लंडच्या गोलंदाजांनी सुरुवातीला काही प्रमाणात यशही मिळवले. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा एकदा स्वस्तात बाद झाला आणि भारतीय चाहत्यांची धाकधूक वाढली. मात्र दुसरा सलामीवीर आणि यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसन याने परिस्थितीची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. स्पर्धेतील महत्त्वाच्या टप्प्यावर त्याने आक्रमक फलंदाजी करत इंग्लंडच्या गोलंदाजांवर दबाव टाकला. सॅमसनने चौफेर फटकेबाजी करत ८९ धावांची तडाखेबंद खेळी साकारली आणि भारतीय डावाला भक्कम आधार दिला. सॅमसनला मधल्या फळीतूनही चांगली साथ मिळाली. ईशान किशनने संयमी पण उपयुक्त धावा केल्या, तर शिवम दुबेनेही धडाकेबाज फटकेबाजी करत धावगती वाढवली. हार्दिक पांड्या, तिलक वर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी छोट्या पण महत्त्वपूर्ण खेळी करून संघाच्या धावसंख्येला वेग दिला. त्यांच्या योगदानामुळे भारताने निर्धारित २० षटकांत ७ गडी गमावून तब्बल २५३ धावा उभारल्या. उपान्त्य फेरीसारख्या दबावाच्या सामन्यात एवढी मोठी धावसंख्या उभारणे ही मोठी कामगिरी मानली जाते. विशेष म्हणजे टी-२० विश्वचषकात सलग दोन सामन्यांत अडीचशे धावांचा टप्पा ओलांडणारा भारत हा पहिलाच संघ ठरला. २५४ धावांचे आव्हान समोर ठेवताना भारतीय चाहत्यांना विजयाबद्दल बराच विश्वास वाटत होता. एवढ्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करणे सोपे नसते, असा सर्वसाधारण अंदाज होता. मात्र इंग्लंडच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत भारतीय गोलंदाजांना सतत आव्हान दिले. इंग्लंडचा सलामीवीर फील सॉल्ट आणि कर्णधार हॅरी ब्रुक्स लवकर बाद झाले, तरी युवा फलंदाज जेकब बेथेल याने हार मानली नाही. एकीकडे विकेट्स पडत असतानाही त्याने एक बाजू भक्कमपणे सांभाळत आक्रमक फलंदाजी सुरू ठेवली. बेथेलने चौकार-षटकारांची आतषबाजी करत इंग्लंडच्या डावाला वेग दिला. त्याच्या खेळीमुळे इंग्लंडच्या धावांचा वेग सतत टिकून राहिला. फलंदाज बाद होत असले तरी धावगती जवळपास बाराच्या सरासरीने कायम होती. त्यामुळे सतराव्या षटकापर्यंत सामना इंग्लंडच्या आवाक्यात असल्याचे चित्र दिसत होते. त्या क्षणी भारतीय संघावर दबाव वाढला होता आणि सामना कोणाच्या बाजूने झुकेल याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अशा निर्णायक क्षणी अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराने आपली जादू दाखवली. अठराव्या षटकात त्याने अचूक आणि भेदक गोलंदाजी करत केवळ सहा धावा दिल्या. या षटकाने सामन्याचा कल पूर्णपणे बदलून टाकला. इंग्लंडच्या फलंदाजांवर अचानक दबाव वाढला आणि भारतीय संघ पुन्हा सामन्यात वरचढ ठरू लागला. पुढच्याच षटकात हार्दिक पांड्यानेही नियंत्रित गोलंदाजी करत धावांचा वेग रोखला आणि भारताचा विजय जवळजवळ निश्चित केला. या दरम्यान जेकब बेथेलने शतकी खेळी साकारत इंग्लंडच्या आशा जिवंत ठेवल्या. त्याने केलेले शतक हे पराक्रमी होते; मात्र त्याला संघाला विजय मिळवून देता आला नाही. अखेर निर्धारित २० षटकांत इंग्लंडचा डाव २४६ धावांवर थांबला आणि भारताने सात धावांनी सामना जिंकत अंतिम फेरीत स्थान मिळवले. भारताच्या या संस्मरणीय विजयाचे शिल्पकार संजू सॅमसन आणि जसप्रीत बुमरा ठरले. सामनावीर पुरस्कार सॅमसनला मिळाला; मात्र पुरस्कार स्वीकारताना त्याने मोठेपणा दाखवत या विजयाचे खरे श्रेय बुमराच्या निर्णायक गोलंदाजीला दिले. अशा खेळाडूंमुळेच संघाची ताकद वाढते, असेही त्याने नमूद केले.


CorelDRAW

WE ARE HIRING

JOIN OUR TEAM

Ps Ai Id

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp

Contact : 7720046005


## छ. शिवाजी महाराजांचे बसस्थानकासमोर ...

पान १ वरुन-

विविध पक्षांचे व विविध सेवाभावी संघटनांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेर मधील हायटेक बसस्थानकासमोर मध्यवर्ती ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक व्हावे यासाठी मा.मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सर्वप्रथम पाठपुरावा केला. तत्कालीन नगराध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात २०१८ मध्ये नगरपरिषदेने याबाबत पाठपुरावा केला. जे आता स्मारकाची मागणी करता ते त्या वेळेस कुठेच नव्हते. २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी या कामाला गती दिली. २०२३ मध्ये आपण तत्कालीन परिवहन मंत्री तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून महाराजांच्या स्मारकासाठी बसस्थानकावर राज्यात प्रथम जागा मंजूर करून घेतली. यासाठी निधी देण्याची घोषणा शासनाने केली. मात्र आता शासनाने निधी दिला तर आहेच नाही तर शासनाच्या मदतीशिवाय लोकवर्गणी, नगरपरिषद,आमदारनिधी, जिल्हा नियोजन समिती या माध्यमातून येत्या वर्षभरामध्ये भव्य स्मारक उभारणार आहोत.

छत्रपती शिवाजी महाराज हे बहुजनांचे राजे होते. १८ पगड जाती व बारा बलुतेदारांचे स्वराज्य त्यांनी निर्माण केले. महाराजांनी स्वतःचे महाल उभारले नाही परंतु गडकिल्ले हेच त्यांचे महाल आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे देशाची अस्मिता आहे त्यांचे भव्य स्मारक संगमनेर मध्ये पूर्ण करणार आहोत.

संगमनेर सेवा समितीला संगमनेर मधील नागरिकांनी भरभरून यश दिले आणि या सेवा समितीच्या सर्व नगरसेवकांनी पहिल्याच बैठकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,सावित्रीबाई फुले,अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्याचा ठराव पारित केला. हे अत्यंत कौतुकास्पद आहे. महाराजांच्या स्मारकाबाबतही सर्व नागरिकांच्या मताचा आदर करून जनतेला जसे हवे आहे तसे भव्य स्मारक उभारण्यात येईल असे आमदार सत्यजित तांबे यांनी जाहीर करताच टाळ्यांचा कडकडाट करण्यात आला. तर डॉ.मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, संगमनेर हे शांत आणि सुसंस्कृत शहर आहे येथे महाराजांचे भव्य स्मारक करण्यासाठी नागरिकांना हे स्मारक कसे हवे याबाबत जाणून घेण्यात येणार आहे. याचबरोबर शहराच्या विकास कामांमध्ये नागरिकांचा सहभाग राहणार असल्याच्या त्या म्हणाल्या. यावेळी संगमनेर नगर परिषदेचे सर्व पदाधिकारी,संगमनेर शहरातील विविध विभागाचे अधिकारी, आणि शहरातील नागरिक महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५१७/२०२६ दिनांक - २५/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. सोमनाथ दत्तू रहाणे, रा. जाखुरी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ३०/१२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. जाखुरी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे सोमनाथ दत्तू रहाणे यांचा जन्म मौजे जाखुरी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २४/०४/१९९१ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी जाखुरी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी जाखुरी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

### कै. म्हातारबा लक्ष्मण पा. आहेर प्रतिष्ठाण संचलित, सिताई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मु. कुरकुंडी, पो. घारगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संचलित)

College Code - 1568 Pun Code - CAAA021036

**अर्जंट शिक्षक भरणे आहे**

| अ. नं. | पदनाम | विषय | मंजूर पदसंख्या | भरावयाची पदसंख्या | सामाजिक आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक | इंग्रजी | ०१ | ०१ | ०१- अराखीव (open to all) |
| २ | सहाय्यक प्राध्यापक | मराठी | ०१ | ०१ | ०१- अराखीव (open to all) |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | भूगोल | ०२ | ०२ | ०१- अनु. जाती, ०१- अराखीव |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र | ०३ | ०३ | ०१- अनु. जाती, ०१-विजा-अ,०१- अराखीव |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक | कॉमर्स | ०३ | ०२ | ०१- अनु. जाती, ०१- अराखीव |
| ६ | सहाय्यक प्राध्यापक | अर्थशास्त्र | ०१ | ०१ | ०१- अराखीव (open to all) |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक | वनस्पतीशास्त्र | ०२ | ०२ | ०१- अनु. जाती, ०१- अराखीव |
| ८ | सहाय्यक प्राध्यापक | प्राणीशास्त्र | ०१ | ०१ | ०१- अराखीव (open to all) |
| ९ | सहाय्यक प्राध्यापक | ग्रंथपाल | ०१ | ०१ | ०१- अराखीव (open to all) |
| १० | सहाय्यक प्राध्यापक | शाररीक शिक्षण | ०१ | ०१ | ०१- अराखीव (open to all) |

**शैक्षणिक अर्हता-** M.A./ M.Com/ MSC. - SET / NET / PH.D. असावा

सदर उमेदवार हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, यांच्या नियमानुसार qualified असावा.

**मुलाखत दिनांक-** १६/०३/२०२६ सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत

**स्थळ-** मा. व्यवस्थापक कार्यालय, सिताई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मु. कुरकुंडी, पो. घारगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

आमच्या संस्थेचे महाविद्यालय हे इतर विद्यापीठांशी संलग्नित नाहीत. उपरोक्त नमूद पदांची माहिती खरी असून त्यानुसार स्थानिक निवड समतीद्वारे पूर्णवेळ तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात शिक्षकी पदे भरण्याकरिता उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या आरक्षणाची पडताळणी करुन मिळावी, ही विनंती.

**संपर्क- 9145673461**

### ग्रामपंचायत माळेवाडी, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर

खालील कामांच्या मोहरबंद ब-१ निविदा, दोन लिफापे पद्धतीनुसार मा. सरपंच ग्रामपंचायत माळेवाडी ता. श्रीरामपुर यांचे वतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. या कामाच्या कोऱ्या निविदा ग्रामपंचायत माळेवाडी या कार्यालयात दि. ०७/०३/२०२६ ते दि. १३/०३/२०२६ पर्यंत ग्रामपंचायत माळेवाडी ता. श्रीरामपुर निविदा फी भरल्यास देण्यात येतील.

**निविदा मागणी कालावधी दि. ०७/०३/२०२६ ते १३/०३/२०२६**

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | सुरक्षा अनामत १% ठेकेदाराचे वर्गीकारानुसार | कामाचा कालावधी | निविदेचा प्रकार | कोऱ्या निविदेची किंमत | ठेकेदाराचा वर्ग | योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जि.प. शाळा पेव्हिंग ब्लॉक करणे | ६३१००/- | ६३१/- | ३ महिना | ब-१ | २३६/- | सु.बे. अभियंता | १५ वा वित्त आयोग योजना सन २०२५/२६ |
| २ | मौजे माळेवाडी ता. श्रीरामपूर येथील स्मशानभूमी परिसर येथे सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे | २५३००३/- | २५३०/- | ३ महिना | ब-१ | २३६/- | खुला | स्वच्छ भारत मिशन सन २०२५/२६व (१५ वित्त आयोग २०५/२६ जोड निधी) |

१) ठेकेदाराने कोऱ्या निविदा संचाचे अर्जासोबत अद्यावत नोंदणी दाखल्याच्या, PAN क्रमांक, GST क्रमांक प्रती जोडणेआवशक आहे. २) कामाचा व कामावरील मजुरांचा शासकीय विमा उतरवणे ठेकेदारास बंधनकारक. ३) निविदा दि. ०७/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या कालावधीत कोऱ्या निविदा विक्री साठी ग्रामपंचायत माळेवाडी येथे उपलब्ध राहतील ४) उपरोक्त कामाच्या निविदा कोणतेही कारण न दाखविता स्वीकारण्याच्या किंवा नाकारण्याचा अधिकार मा. ग्रामपंचायत माळेवाडी ता. श्रीरामपुर यांनी राखीव ठेवला आहे. ५) दिनांक १६/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय येथे निविदा उघडण्यात येतील. ६) निविदा दि. ०७/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या कालावधीत निविदा दर टाकून सीलबंद लिफापे मध्ये ग्रामपंचायत कार्यालय माळेवाडी येथे सादर करता येतील.

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रा.पं. माळेवाडी, ता. श्रीरामपूर, जि. अ.नगर

सरपंच, ग्रा.पं. माळेवाडी, ता. श्रीरामपूर, जि. अ.नगर


पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

पाहिजेत
नामांकित साऊथ इंडीयन कॅफेसाठी
कॅशियर | हेल्पर
साऊथ इंडीयन कुक
१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक
संगमनेर
9518722868

पाहिजेत
अकाऊंटट - २ जागा (टॅली कोर्स)
ड्रायव्हर - ३ जागा
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
9370071717
9822791484

पाहिजेत
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

पाहिजेत
होलसेल दुकानासाठी मुले/ मुली पाहिजेत
अनुभवास प्राधान्य
हेल्पर - २
सेल्समन - २
7020585298
9422905155

पाहिजेत
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

बौद्ध वधू पाहिजे
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही. अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

पाहिजेत
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

ड्रायव्हर पाहिजे
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

ड्रायव्हर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्यमन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904






अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
MALPANI
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# 'झाकाळल्या नभात' काव्यसंग्रहाचे उत्साहात प्रकाशन

## साहित्य, काव्य आणि वाचनसंस्कृतीचा सुंदर संगम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - साहित्यप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरलेल्या वातावरणात साहित्य कला मंच, संगमनेर यांच्या वतीने आयोजित 'झाकाळल्या नभात' या कवी सुभाष बी. गोडगे यांच्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी दुपारी ४ वाजता उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात आदर्श सार्वजनिक वाचनालय पुरस्कार तसेच काव्य वाचन स्पर्धेतील पारितोषिकांचे वितरण देखील करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कवी प्रा. शशिकांत शिंदे आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. पोपट सातपुते ड. प्रदिप मालपाणी यांची उपस्थिती लाभली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'झाकाळल्या नभात' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. आपल्या मनोगतात मान्यवरांनी कवी सुभाष गोडगे यांच्या काव्यातील संवेदनशीलता, सामाजिक जाण आणि जीवनातील विविध अनुभवांचे प्रतिबिंब यांचे कौतुक केले. अशा साहित्यिक उपक्रमांमुळे वाचन संस्कृती बळकट होऊन नवोदित कवींना व्यासपीठ मिळते, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन साहित्य कला मंच, संगमनेर कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाखाली केले होते. मंचाच्या कार्यात अध्यक्षा सौ. सुनिता घुले, कार्याध्यक्ष संजय नवले, उपाध्यक्ष कारभारी देव्हारे, उपाध्यक्ष नितीन वाकचौरे, सचिव अनिल चांडक, सहसचिव दर्शन जोशी, खजिनदार अकबर शेख, कायदेशीर सल्लागार ॲड. सुभाष गोडगे, तज्ज्ञ संचालक विजय पाटील, जयराम घुले युवा संघटक सागर पन्हाळे, आलोक प्रकाश बर्डे, मार्गदर्शक सौ. प्रतिमा काळे तसेच महिला संघटक सौ. नम्रता दिघे आणि सौ. अर्चना ठुबे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास संगमनेर परिसरातील साहित्यप्रेमी, कवी, वाचक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. काव्य, साहित्य आणि संस्कृतीचा संगम घडविणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी गोडगे परिवार सौ सविता गोडगे, प्रणव गोडगे अशोक गोडगे स्वप्निल दिघे उपस्थित होते .

# बेलापूरच्या भोंदू बाबाकडून अनेकांची फसवणूक

## कारवाईसाठी 'अंनिस'चा पुढाकार; 'बाबा' चे कारनामे दडपणाऱ्यांची नावे उघड करणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - देव अंगात संचारला, असे भासवून काही भोंदूबाबा आलेल्या भक्तांचे आर्थिक, शारीरिक व मानसिक - शोषण करत असल्याची चर्चा - बेलापूर व परिसरात सुरू आहे. ने अशा भोंदूगिरी करणाऱ्या बाबा संदर्भात काही तक्रारी असल्यास अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संपर्क साधावा, असे - आवाहन अंनिसच्या राज्य - सचिव ॲड. रंजनाताई गवांदे, बाबा आरगडे व देविदास देसाई यांनी केले आहे.

याबाबत अंनिसच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बेलापुरातील एका भोंदूगिरी करणाऱ्या बाबाने काही महिलांचे लैंगिक शोषण केल्याची परिसरात चर्चा आहे. बाबांच्या भितीपोटी व बदनामीच्या भितीमुळे सदर महिला तक्रार देण्यास पुढे येत उघड करुन नाही. मात्र ज्या महिलांची आर्थिक, शारीरिक फसवणूक झाली असेल, अशा महिलांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांशी किंवा पोलीस स्टेशनमध्ये संपर्क साधावा. त्या भोंदू बाबाची भोंदूगिरी समाजासमोर त्याच्यावर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल. संबंधित भोंदू बाबाविरुद्ध कारवाई करण्याच्यादृष्टीने अंनिसने पावले उचलली असून त्या भोंदू बाबाने आलेल्या भक्तांकडून मोठ्या रकमा वसुल केल्याचीही चर्चा आहे. या बाबाकडे येणाऱ्यांमध्ये अनेक

राजकीय पुढाऱ्यांचा भरणा आहे. राजकीय पुढाऱ्यांच्या आश्रयाखाली हा बाबा महिलांचे लैंगिक शोषण करत असल्याची माहिती अंनिसच्या कार्यकर्त्यांना मिळाली आहे. त्या भोंदू बाबांचे कारनामे दडपण्यासाठी मदत करणाऱ्या पुढाऱ्यांची नावे देखील उघड केली जाणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या पत्रकावर अंनिसच्या राज्य सचिव ॲड. रंजनाताई गवांदे, बाबा आरगडे, देविदास देसाई, छायाताई बंगाळ आदींच्या सह्या आहेत.

दरम्यान या भोंदूबाबाच्या भितीपोटी व बदनामीच्या भितीमुळे फसवणूक झालेली संबंधित व्यक्ती तक्रार देण्यास पुढे येत नाही. मात्र ज्यांची आर्थिक, शारीरिक फसवणूक झाली असेल, त्यांनी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव ॲड. रंजनाताई गवांदे यांनी केले आहे.

# १५ दिवसांत अहवाल सादर करा अन्यथा जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई - ना. शिंदे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर-

दळणवळण सुविधेच्या दृष्टीने ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे यांचे महत्व अनन्य साधारण आहे. असे असतांना ३४ वनविभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांनी आवश्यक त्या परवानण्यांच्या दृष्टीने विनाविलंब कार्यवाही करावी. विकास कामांना वेग देणे हे प्रशासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र कर्जतसह अनेक ठिकाणचे रस्त्यांची कामे अपूर्ण असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. याबद्दल तीव्र ना पसंती व्यक्त करत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी १५ दिवसाच्या आत यासंदर्भातील वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्याचप्रमाणे विलंब आणि दफ्तरदिरंगाईस जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेत दिले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुका व परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभागाच्या अखत्यारीत असलेल्या प्रलंबित रस्त्यांच्या कामांबाबत गुरूवारी विधान भवन, मुंबई येथे महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत प्रमुख मार्गांसह प्रलंबित कामांची गंभीर दखल घेत सभापतींनी संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्य पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. कामातील विलंबाबाबत प्रत्यक्ष जबाबदारी निश्चित करून, प्रलंबित कामांची सखोल चौकशी करण्याचे आणि दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

या प्रकरणी प्रशासनाला १५ दिवसांच्या आत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, प्रगतीचा आढावा घेण्यासाठी २० मार्च रोजी पुन्हा विशेष बैठक बोलावण्यात आली आहे.

# धांदरफळ खुर्दला महसूलचे महाराजस्व अभियान शिबिर!

## पालकमंत्री विखे पाटील व आ. अमोल खताळ यांच्या हस्ते उद्घाटन

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील बिरोबा मंदिर परिसरामध्ये शनिवार दिनांक ७ मार्च रोजी महसूल विभागाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत विविध दाखल्यांचे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिरामध्ये धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द, गोडसेवाडी, नांदुरी दुमाला, मिर्झापूर, निमगाव बुद्रुक, निमगाव खुर्द, पेमगिरी, सांगवी, कौठे धांदरफळ, सावरचोळ, धुपे, मेंगाळवाडी व शिरसगाव या गावांतील नागरिकांना विविध महसुली सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या अभियान शिबिरात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरी असलेले ७/१२ व ८-अ उतारे वाटप करण्यात येणार आहे. तसेच उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-





क्रीमीलेअर प्रमाणपत्र यांसह विविध दाखले देण्यात येणार आहेत. या शिवाय अकृषिक परवानगी व तरतुदींबाबत मार्गदर्शन, नवीन व्यवस्थेनुसार 'सनद' प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शालेय दाखले यांचाही समावेश आहे.

तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनासंबंधी प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी तसेच भूसंपादन अन अकृषिक परवानगी संदर्भातील 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्याचे कामही यावेळी करण्यात येणार आहे. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवांचा एकाच ठिकाणी लाभ मिळणार असल्याने परिसरातील गावांतील नागरिकांनी या महाराजस्व अभियान' शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेना महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# वानखेडेवर विजय, आता अहमदाबादची रणभूमी!

## इंग्लंडला रोखून भारत फायनलमध्ये, आता न्यूझीलंडशी टक्कर




### संजूने बुमराहला सामनावीर घोषित केले

**सामन्यानंतर पुरस्कार स्वीकारताना संजू सॅमसनने सामनावीराचा मान जसप्रीत बुमराहला अर्पण करत सर्वांचे लक्ष वेधले. तो म्हणाला, मी हा पुरस्कार बुमराहला देऊ इच्छितो. तो वर्ल्ड क्लास गोलंदाज आहे आणि अशा प्रकारचा खेळाडू पिढीतून एकदाच जन्माला येतो. आज त्याने तेच सिद्ध केले. जर डेथ ओव्हर्समध्ये त्याने तशी अचूक गोलंदाजी केली नसती, तर कदाचित मी आज येथे उभा नसतो. याचे संपूर्ण श्रेय आमच्या गोलंदाजांना जाते, ज्यांनी कठीण परिस्थितीतही स्वत:वर विश्वास ठेवला.**




**मुंबई (प्रतिनिधी)–**

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात गतविजेत्या टीम इंडियाने इंग्लंडवर ७ धावांनी रोमांचक विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ गडी गमावून २५३ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी जोरदार प्रतिकार केला. मधल्या फळीतील जेकब बेथेलने केवळ ४८ चेंडूत १०५ धावांची झंझावाती खेळी करत सामना रंगतदार केला, मात्र भारतीय गोलंदाजांनी शेवटच्या षटकांपर्यंत संयम राखत इंग्लंडला २० षटकांत ७ गडी गमावून २४६ धावांवर रोखले आणि विजय आपल्या नावावर केला. या विजयासह भारताने टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात चौथ्यांदा अंतिम फेरी गाठली आहे. यापूर्वी २००७, २०१४ आणि २०२४ मध्येही भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. आता ८ मार्च रोजी अहमदाबाद येथे होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे.

या सामन्यात भारतीय फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी करत इंग्लंडच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला. संजू सॅमसनने ८९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर शिवम दुबेने ४३ धावांचे योगदान दिले. इशान किशनने ३९ धावा केल्या, हार्दिक पंड्याने २७ धावा जोडल्या आणि तिलक वर्माने २१ धावांची भर घातली. इंग्लंडकडून विल जॅक्स आणि आदिल रशीद यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर जोफ्रा आर्चरने एक विकेट घेतली. याशिवाय दोन भारतीय फलंदाज धावबाद झाले. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र भारतीय फलंदाजांच्या आक्रमक खेळीमुळे त्यांचा हा निर्णय फारसा फायदेशीर ठरला नाही.

सॅमसनचे शतक थोडक्यात हुकले असले तरी त्याने याबाबत कोणतीही खंत व्यक्त केली नाही. तो म्हणाला, टी-२० क्रिकेटमध्ये शतक करणे हे ध्येय नसते. या प्रकारात सतत वेगाने धावा करणे अधिक महत्त्वाचे असते. जेव्हा तुम्ही तुमच्या संघाला विजय मिळवून देता, तेव्हा तुम्ही किती धावा केल्या याला फारसे महत्त्व राहत नाही. माझ्या संघाच्या विजयात योगदान देता आले, याचा मला आनंद आहे.

दरम्यान, अंतिम सामन्यापूर्वी भारतीय संघ व्यवस्थापनासमोर संघरचनेबाबत काही प्रश्न उभे राहिले आहेत. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना प्लेइंग इलेव्हनबाबत महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागू शकतो. कारण जगातील क्रमांक एक फलंदाज मानला जाणारा अभिषेक शर्मा आणि क्रमांक एक गोलंदाज वरुण चक्रवर्ती यांची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात अभिषेक शर्मा केवळ ७ चेंडूत ९ धावा करून बाद झाला. संपूर्ण स्पर्धेत त्याची कामगिरी समाधानकारक राहिली नाही आणि तो फक्त झिम्बाब्वेविरुद्ध अर्धशतक झळकावू शकला आहे.

भारतीय संघाकडे पर्याय म्हणून रिंकू सिंग हा मजबूत फलंदाज उपलब्ध आहे. तसेच अष्टपैलू खेळाडू म्हणून वॉशिंग्टन सुंदर यालाही संधी दिली जाऊ शकते. गोलंदाजी विभागात वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि फिरकीपटू कुलदीप यादव हेही पर्याय संघ व्यवस्थापनासमोर आहेत. जर संघात बदल करण्याचा निर्णय झाला, तर अभिषेक शर्माच्या जागी रिंकू सिंगला अंतिम सामन्यात संधी मिळण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत संजू सॅमसनसोबत इशान किशन डावाची सुरुवात करू शकतो. अंतिम फेरीत न्यूझीलंडविरुद्ध भारताला आपली सर्वोत्तम कामगिरी करावी लागणार असून चाहत्यांच्या अपेक्षाही उंचावल्या आहेत.

# मुंढेंकडून बोगस दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा धडाका



मुंबई (वृत्तसंस्था)

तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागाचा सचिव म्हणून पदभार घेतल्यानंतर, या विभागामार्फत खऱ्या दिव्यांगांना न्याय देण्याच्या भूमिकेत आक्रमक आहे. यातूनच तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व प्रशासकीय विभागातील दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी आणि युडीआयडी कार्ड फेरतपासणीचा आदेश देत, त्याचे अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

यातच सांगली जिल्हा परिषदेमधील १३ शिक्षक आणि एका कर्मचाऱ्याला वारंवार सूचना देऊन देखील दिव्यांग ओळखपत्र व युडीआयडी कार्ड सादर न केल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी ही कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे. तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागाचा कारभार हाती घेतल्यापासून, ते दिव्यांग कल्याण विभागातील कामांवर विशेष लक्ष देत आहेत. दिव्यांगांना न्याय मिळावा या भूमिकेत ते आहेत. यातूनच त्यांनी राज्यातील सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या विभागातील दिव्यांगांची, त्यांच्याकडील प्रमाणपत्रांची, युडीआयडी कार्डची फेरतपासणी करून, त्याचा अहवाल सादर करण्याचा आदेश दिला आहे.

तुकाराम मुंढे यांच्या या आदेशाला फक्त दोन प्रशासकीय विभागाने प्रतिसाद दिला आहे. आता ग्राम विकास विभागाकडून कार्यवाही सुरू झाली आहेत. यातच सांगली जिल्हा परिषदेतून मोठी माहिती समोर आली आहे. वारंवार सूचना देऊन देखील १४ कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडील दिव्यांग प्रमाणपत्र आणि युड़ीआयडी कार्ड सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

सांगली जिल्हा परिषदेचे सीईओ विशाल नरवाडे यांनी ही कारवाई केली आहे. निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये १३ शिक्षक व एक शिपाई कर्मचाऱ्याचा समावेश आहे. यानंतर राज्यातील प्रशासकीय पातळीवर चौकशी सुरू आहे.

सांगली जिल्हा परिषदेत चौकशी सुरू असतानाच, जिल्हा परिषदेकडून संबंधित कर्मचाऱ्यांना दिव्यांग ओळखपत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पण ते सादर न केल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ तसेच सरकारच्या निर्देशानुसार सरकारी कर्मचाऱ्यांनी युनिक डिसॅबिलिटी आयडी (युडीआडी) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्र सादर करण्यास संबंधित कर्मचाऱ्यांना जुलै २०२५ पासून वारंवार सूचना होत्या. प्रशासनानेही नोटीस दिली होती.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरु होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर...................... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# संगमनेर उपविभागात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर उपविभागात एखादी गंभीर गुन्ह्याची घटना घडल्यास घटनास्थळी विविध वैज्ञानिक पुरावे गोळा करण्यासाठी यापूर्वी अहिल्यानगर येथून मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनला पाचारण करावे लागत होते. त्यामुळे घटनास्थळी पोहोचण्यासाठी वेळ लागत असल्याने तपास प्रक्रियेत विलंब होत असे. मात्र आता ही अडचण दूर झाली असून, संगमनेर उपविभागासाठी स्वतंत्र मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे. या व्हॅनमुळे गंभीर गुन्ह्यांच्या तपासाला मोठी मदत होणार आहे.

या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे उदघाटन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रवीण साळुंखे व शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या हस्ते तालुका पोलिस ठाण्याच्या आवारात करण्यात आले.

यावेळी अमित महाजन, सचिन उगले, बन्सी टोपले, सचिन सोनवणे, संपत जायभाय यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यापूर्वी संगमनेर उपविभागात खून, दरोडा, घरफोडी, संशयास्पद मृत्यू किंवा इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या घटना घडल्यास घटनास्थळावरील बोटांचे उसे, रक्ताचे नमुने, पावलांचे ठसे, शस्त्रे, तसेच इतर महत्त्वाचे वैज्ञानिक पुरावे गोळा करण्यासाठी अहिल्यानगर येथील फॉरेन्सिक पथकाला बोलवावे लागत असे. त्या पथकाला घटनास्थळी पोहोचण्यासाठी बराच वेळ लागत होता. मात्र, आता संगमनेर उपविभागातच मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध झाल्यामुळे कोणतीही गंभीर घटना घडताच तत्काळ ही व्हॅन घटनास्थळी पोहोचणार आहे. त्यामुळे घटनास्थळाची वैज्ञानिक पद्धतीने तपासणी करून आवश्यक पुरवे गोळा करण्याचे काम वेगाने आणि अधिक अचूकपणे होणार आहे.

यामुळे गुन्ह्यांचा तपार्म जलद गतीने होण्यास मदत होणार असल्याचे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले. ही मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन संगमनेर आणि अकोले या दोन्ही तालुक्यांमधील गावांमध्ये, तसेच दुर्गम वाडी-वस्त्यांवर घडणाऱ्या घटनांसाठीही तत्काळ उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठीही पोलिसांना मोठी मदत मिळणार आहे.

# डीजे वाजवल्यास कारवाईचा...

पान १ वरून - मंगल कार्यालयांत ही हळदीचा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालतात. गाणे, डीजेचा कर्णकर्कश आवाजाने परिसरातील नागरिकांची अक्षरशः झोप उडविली आहे. या आवाजामुळे मुलांना अभ्यास करता येत नाही. ज्येष्ठ नागरिकांना आवाजाने त्रास होतो. व्यामुळे रात्री १० ते सकाळी ६ यावेळेत डीजे वाजविण्यास बंदी आहे. असे असताना रात्री उशिरापर्यंत डीजे वाजविले जातात. बहुतांश लग्न समारंभ मंगलकार्यालयात पार पडतात. डीजेच्या आवाजावर नियंत्रण ठेवणे मंगल कार्यालय चालकांची ही जबाबदारी आहे. मात्र मंगल कार्यालयांचे मालक डीजेवर नियंत्रण ठेवत नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. यापुढे लग्नसमारंभ, वरात, हळदीच्या कार्यक्रमात डीजे वाजविल्यास पर्यावरण व ध्वनी प्रदूषण कायद्यानुसार कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. दरम्यान डीजे मालक, ऑपरेटर, मंगल कार्यालयांचे मालक, जनरेटर वाहन चालकांना जबाबदार धरून संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

# संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघातर्फे नवनिर्वाचित नगराध्यक्ष-नगरसेवकांचा सत्कार

## महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने संगमनेर नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांचा सत्कार समारंभ तसेच जागतिक महिला दिनानिमित्त अमृतवाहिनी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. बायसा गुंजाळ, सामाजिक कार्यकर्त्या किरण महेश झंवर, श्री स्वामी समर्थ टायपिंग इन्स्टयुट संचालिका ज्योती तुकाराम हासे या महिला भगिनींना सन्मानित करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम रविवार दि. ८ मार्च २०२६ रोजी दुपारी ४ वाजता नेहरू गार्डन येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे होणार आहे. या कार्यक्रमास नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजीत तांबे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पारितोषिक विजेते आदर्श शिक्षक व संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष सोमनाथ कळसकर गुरुजी राहणार आहेत.

समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघाचे कार्याध्यक्ष प्रा. ज्ञानेश्वर गोंटे, सरचिटणीस नंदकिशोर बेल्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यासाठी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. जी. पी. शेख, सुभाष पोखरकर, डॉ. सोमनाथ सातपुते, गणेशलाल बाहेती, रत्नाकर पगारे, कोषाध्यक्ष सुरेशशेठ जाजु, सरचिटणीस अशोक नवले, सतिश घबाडे तसेच महासंघाचे पदाधिकारी, संचालक व सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# संगमनेर बसस्थानकात महायुतीने उभारला भव्य अश्वारुढ पुतळा



छाया- प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाच्या निमित्ताने शिवसेना-महायुतीच्या वतीने आ. अमोल खताळ यांच्या संकल्पनेतून संगमनेर बस स्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या ठिकाणी आ. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, बंधू राहुल खताळ तसेच मराठा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख, शिवसेनेचे शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे यांच्यासह महायुती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी यांच्या हस्ते मंत्रोच्चारात शिवपूजन करून महाआरती करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही संगमनेर बस स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. शहरात अश्वारूढच पुतळा उभारला जाईल असे फलकही सर्वत्र झळकले आहे. बस स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ हा पुतळा उभारल्या मुळे येणाऱ्या-जाणाऱ्या शिवभक्तांचे तो खास आकर्षण ठरला आहे. लहान मुलांपासून ते तरुण-तरुणी, महिला-पुरुष अशा सर्वच नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर फोटो काढत आपल्या मोबाईलमध्ये त्या क्षणांची छबी कैद केली. त्यामुळे संपूर्ण संगमनेरकरांसाठी हा पुतळा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालय समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका!
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधेसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी लेडीज वेअर
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा, पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25